# शिक्षणाची नवी दिशाः लोकशाहीचे शिक्षण व शिक्षणातील लोकशाही

स्वातंत्र्योत्तर काळात, सर्वच स्तरांवरील भारतातील शिक्षण कमजोर राहिलेले आहे; याचे कारण म्हणजे, एखादी निश्चित ध्येय-दिशा ठरवून शिक्षणाची धोरणे कधीच ठरविली गेली नाहीत. भारतात गावपातळीवर स्थिर झालेली तत्कालीन शिक्षणव्यवस्था बदलून ब्रिटिशांनी नवी शिक्षणव्यवस्था आणली, ती काही निश्चित उद्दिष्ट समोर ठेवून; आणि नंतर दिडशे वर्षे, काळानुरूप धोरणे ठरविली तीही मूळ उद्दिष्टांच्या दिशेने. त्यामुळे त्यात एकप्रकारची सुसंगतता होती.

भारतीय स्वातंत्र्यसंग्रामाच्या अखेरच्या पर्वात, गांधीजींनी राजकीय चळवळीची व्यूहरचना ठरविली ती देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या उद्दिष्टाने; तर त्याचकाळात सामाजिक-आर्थिक कार्यांची उभारणी करावयास घेतली ती त्यांना अपेक्षित असलेल्या भावीकाल समाजरचनेच्या विशिष्ट उद्दिष्टाने. गांधीजींनी, १९३७ साली बुनियादी शिक्षणाचा जो विचार मांडला आणि त्याचा प्रयोग आरंभला त्याचे सूत्र बांधले गेले होते ते त्यांनी मांडलेल्या आदर्श समाजरचनेच्या संकल्पाशी. आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण, राजकीयदृष्ट्या लोकशाही विकेंद्रित आणि मानसिकदृष्ट्या उन्नत अशा त-हेचा समाज गांधीजींच्या ग्रामस्वराज्यच्या संकल्पनेत अपेक्षित होता. असा समाज घडविण्याचा अहिंसक मार्ग म्हणून, १९४१ साली, एक अठरा कलमी रचनात्मक कार्यक्रम गांधीजींनी दिला. या रचनात्मक कार्यासाठी लागणारे प्रभावी कार्यकर्ते निर्माण करण्याची जबाबदारी नयी तालीमच्या शिक्षणव्यवहार असणार होती. थोडक्यात असे की, नयी तालीमच्याद्वारे, गांधीजी, एक नवी अधिक युक्त अशी समाजरचना घडवू पाहत होते. केवळ समतोल, सुसंवादी व्यक्तीच नव्हे तर समतोल नि सुसंवादी समाज-एक अशी न्याय्य समाजव्यवस्था की जी मध्ये, ‘आहे रे’ आणि ‘नाही रे’ अशा दोन समाजगटांमध्ये कृत्रिमरित्या फूट पाडणारी, त्यांना विभागणारी रेषा राहणार नाही, आणि प्रत्येकालाच जीवन वेतन आणि स्वातंत्र्याचा हक्क प्राप्त होईल, हे या नव्या शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट होते.

स्वातंत्र्योत्तर काळात गांधीजींच्या समाजरचनेच्या स्वप्नास विराम मिळाला; पण त्याची जागा घेणारी अन्य कोणती समाजरचनेची ध्येयस्वप्ने देशापुढे मांडली गेली नाहीत; तशी देणारा नेताही नंतरच्या काळात निर्माण झाला नाही; सरकारनेही, तत्कालीन पंचवार्षिक योजनांच्या मांडणीत असे व्यापक ध्येय ठेवल्याचे दिसत नाही. अर्थात् अशी उणीव काही प्रमाणात भरून काढली ती भारतीय संविधानाच्या जाहीरनाम्याने !
भारतीय संविधानाने आपल्यापुढे न्याय्य अशा लोकशाही समाजरचनेचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यासाठी व्यक्तिगत स्तरावरील, विचार करण्याचे, अभिव्यक्तीचे वगैरे स्वातंत्र अबाधित ठेवले आहे. समता, बंधुत्वाचा उद्घोष

केलेला आहे. न्याय्यतेवर आधारलेली लोकशाही समाजरचनेची उद्दिष्टे कोणती असावीत याचा उत्तम नमुना भारतीय संविधानाने जगासमोर ठेवला आहे.

मला वाटते, भारतीय राज्यघटनेचा जाहीरनामा हे आपल्या देशाचे मिशन स्टेटमेंट आहे असे मानून, त्या जीवनध्येयाकडे मार्गक्रमण करणारी पिढ्या निर्माण करीत जाणे हेच शिक्षणाचे कार्य आपण गृहीत धरले पाहिजे. वेळोवेळच्या सामाजिक-आर्थिक-तांत्रिक बदलांची दखल घेत घेत, आवश्यक ते धोरणविषयक बदल करीत, पण निश्चित अशा, भारतीय संविधानाच्या जाहीरनाम्याने लिहून दिलेल्या भावीकाल समाजरचनेच्या ध्येयाकडे वाटचाल करीतच आपले शिक्षण गेले पाहिजे. सर्व स्तरांवरील शिक्षणाची आंतर्बाह्य रचना अशात-हेने घडविली पाहिजे.

विशिष्ट समाजरचनेचे स्वप्न डोळयांसमोर ठेवून, त्यादिशेने दीर्घकालची वाट चालत राहणे, ही गोष्ट घडायची असेल तर त्या वळणानेच भारतीय नागरिक घडत जायला हवा; आणि हे काम शिक्षणाला करीत राहायला हवे. त्याची सुरुवात बालशिक्षण-प्राथमिक शिक्षणापासून करून शिक्षणाच्या पुढील सर्वच शिक्षण स्तरांमध्ये नि प्रकारांमध्ये याच दिशेने विद्यार्थीघडणीचा प्रयत्न व्हावा लागेल. प्रत्येक स्तरावर नि प्रत्येक प्रकारच्या शिक्षणामध्ये त्या त्या वेळची स्वतंत्र उद्दिष्टे असतीलच परंतु त्यांची पूर्ती करीत असतानाच, भावी समाजरचनेची विशिष्ट दिशा अंतर्भूत असावी लागेल.

शिक्षण ही प्रवाही गोष्ट असल्यामुळे, कालानुरूप त्यात प्रत्येक स्तरावर स्वतःचे काही प्रश्न निर्माण होत असतात, आणि असे तात्कालिक प्रश्नही सोडवत जावे लागतात. अशावेळी, त्या त्या प्रश्नांची उत्तरे शोधताना, धोरणे ठरविताना, शिक्षणाची दीर्घकालीन दिशा गृहीत धरूनच प्रश्नांना भिडावे लागेल. उदाहरणार्थ, आजचे प्राथमिक शिक्षण डोळयासमोर ठेवून, त्याचे आजचे प्रश्न, आजची सद्यस्थिती आणि भावी काळ समाजरचनेची संविधानप्रणित ध्येयरचना यांची सांगड कशी घालायची हे पाहता येईल.

महाराष्ट्रातील आजच्या प्राथमिक शिक्षणाचा विचार करायचा झाल्यास तो तीन पायऱ्यांनी करता येईल. एक, प्राथमिक शिक्षणाची सद्यपरिस्थिती, दोन, १ एप्रिल २०१० पासून अंमलात आलेला शिक्षणाच्या मूलभूत हक्काचा कायदा आणि तीन, उद्यासाठी आजच्या शिक्षणात करावयाचे परिवर्तन.

**प्राथमिक शिक्षणाची सद्य परिस्थिती**

भारतातील प्राथमिक शिक्षणाचे शालेय पातळीवर तीन मुख्य प्रश्न आहेत:

१. मुलांना शाळेत येती करण्याचा प्रश्न.

२. शाळेत येऊ लागलेली मुले टिकती करण्याचा प्रश्न.

३. टिकून राहिलेल्या मुलांना शिकती करण्याचा प्रश्न.

## १. मुलांना शाळेत येती करण्याचा प्रश्न

शाळेत जाण्याचा वयातील सर्व मुलांना शाळांतून दाखल करण्याचे आजवर केलेले सर्व प्रयत्न अपुरे ठरले आहेत. देशातील अशी सर्व मुले अजूनही शाळेची पहिली पायरीही चढत नाहीत. केंद्र सरकारच्या, मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या, जुलै ते ऑक्टोबर २००५ च्या दरम्यान केलेल्या सर्वेक्षणानुसारे, ६ ते १३ या वयोगटातील १९.४ कोटी मुले होती. त्यांपैकी १.३४ कोटी म्हणजे ६.९४ टक्के मुले अजूनही शाळेबाहेर होती. या आकडेवारीची आणखी विभागणी केली तर दिसून येते की शाळेबाहेर असणाऱ्या मुलांपैकी निम्म्यापेक्षाही जास्त ६८.३ टक्के मुले कधीही शाळेत गेलेली नव्हती. तर उरलेली ३१.७ टक्के मुलांनी कधीतरी शाळेत जाऊन कालांतराने शाळा सोडलेली होती. म्हणजे ही मुले गळती झालेली आहेत.

शाळेत न जाणाऱ्या किंवा शाळा मध्येच सोडणाऱ्या मुलांबाबतचे एक सत्य विदारक आहे. यांपैकी बहुतेक मुले ही आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास वर्गातील आहेत. मुख्यतः दलित, आदिवासी, मुस्लीम आणि मुख्य म्हणजे, त्यातही मुलींची संख्या अधिक आहे. हे सामाजिक-आर्थिक परिमाण खूप महत्त्वाचे आहे. शिक्षण हे जर सामाजिक नि आर्थिक मागासलेपणातून बाहेर पडण्याचे एक साधन असेल तर नेमक्या याच वर्गाला, कोणत्याही कारणांनी का असेना, पण शिक्षणाची पूर्ण संधी प्राप्त न होणे ही बाब त्यांच्या पुढील पिढ्याही मागासलेल्या ठेवण्यात परिणत होते, असा याचा अर्थ होतो.

या, २००५ सालच्या पाहणीतील आकडेवारीत आज, म्हणज २०१० साली, फारसा फरक पडलेला असेल आणि ही आकडेवारी सुधारली असेल असे मानण्यास फारसा वाव नाही. कारण, याच काळांतील 'स्टेटस् एज्युकेशनल रिपोर्टस्' मधून प्राप्त झालेली आकडेवारी असे सांगते की, ६ ते १४ वयोगटातील मुलांचे शाळा-नोंदणीचे प्रमाण २००५ साली ९३.५ टक्के इतके होते ते २००६ साली, म्हणजे पुढल्याच वर्षी ९३.२ टक्क्यांपर्यंत खाली आले होते. म्हणजेच शाळेबाहेरील मुलांच्या संख्येत वाढच झाली होती. याच काळात ७ ते १० या निम्न प्राथमिक स्तरावरील मुलांच्या नोंदणी संख्येतही ९५.३ टक्क्यांवरून ९१.१ टक्क्यांपेक्षा अधिक मुले शाळेत जातात, आणि ही बाब फारशी असमाधानकारक नाही. परंतु असेही समाधान आपल्याला मिळत नाही. प्रत्यक्ष व्यवहारात असे आढळून आले आहे की, ही आकडेवारी फारशी विश्वासार्ह मानता येत नाही. कारण, बरीचशी मुले शाळांमध्ये शिकण्यासाठी नव्हे तर जेवण्यासाठी नोंदणी करतात. त्यामुळे शिकण्याच्या हेतूने शाळांतून शिरणाऱ्या मुलांचे प्रमाण आणखी कमी असण्याची शक्यता आहे. शाळेत प्रवेश केल्यानंतर काही वर्षे मुले तेथे टिकून राहिली तर ती शिकण्याची शक्यता तरी निर्माण होते. परंतु याही बाबतींतील आकडेवारी काही वेगळेच चित्र आपल्यापुढे उभे करते.

## २. मुलांना शाळेत टिकती करण्याचा प्रश्न

शालेय शिक्षणातील गळतीचा प्रश्न हा फार मोठा गंभीर प्रश्न आहे. गळती होण्यामुळे दुहेरी नुकसान होत असते. एक म्हणजे, गळती झालेल्या मुलाचे, शिकलेलेही विसरून जाऊन त्यात वजावट होते. अशिक्षितताच टिकून राहते आणि त्यांचे मागासलेपण दूर होण्याची मिळालेली एक संधीही निरुपयोगी ठरते. दुसरे असे की, अशा मुलांच्या शिक्षणावर होणारा वैयक्तिक आणि सामाजिक परिव्यय खर्च वाया जातो. जेव्हा गळती होणाऱ्या मुलांची संख्या मोठी असते तेव्हा होणारा हा पैशांचा अपव्ययही मोठा असतो. मुलांनी निदान शालांत परीक्षेपर्यंत आपले शिक्षण पूर्ण केले तर त्यांच्यावर झालेला पैशांचा व्यय निरुपयोगी ठरत नाही आणि त्या विद्यार्थ्यांनाही या शिडीवरून अधिक वरच्या पातळीवरील संधी घेणे शक्य होते.

पण, पहिलीत प्रवेश केलेली फारच थोडी मुले शालांत परीक्षेपर्यंत टिकून राहतात. पाचवीपर्यंत ३४ टक्के विद्यार्थी शाळा सोडतात. आठवीपर्यंत आणखी काही विद्यार्थी शाळा सोडून जातात. त्यामुळे आठवीपर्यंत शाळा सोडणाऱ्यांचे प्रमाण ५३ टक्क्यावर जाते. अलीकडे दहावीच्या म्हणजे शालांत परीक्षेस आलेल्या अवास्तव महत्त्वामुळे, नववी आणि दहावी अशी दोनही वर्षे शाळांतून आणि बाहेरही विद्यार्थ्यांच्या मनांवर विलक्षण ताण निर्माण करणारी वर्षे झाली आहेत. त्यामुळे आठवीपर्यंत टिकून राहिलेल्या मुलांपैकी आठवीपर्यंत टिकून राहिलेल्या मुलांपैकी जवळजवळ निम्मे विद्यार्थी ४७.७४ टक्के नववीतच शाळा सोडून बाहेर पडतात; आणि उरलेल्यांपैकी आणखी निम्म्यांपेक्षा अधिक विद्यार्थी ५२.८० टक्के दहावीच्या उंबरठ्यावरच शाळा सोडतात.

मुलांचे शाळेत दाखल होण्याचे वय ही बाब, मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने खूपच महत्त्वाची आहे. सहाव्या वर्षी मुलांनी प्राथमिक शाळेत दाखल होणे अत्यंत आवश्यक आहे. शाळेत प्रवेश करण्याचे, सहाच्या आसपासचे वय हे योग्य वय आहे. ज्या मुलांना बालवाडीत जाण्याची संधी मिळते अशी मुले याच वयात, सहजपणे, पहिलीत प्रवेश करतात. परंतु अनेक मुले अशा संधीअभावी, योग्य वयात शाळेत दाखल होत नाहीत. पालकही वेगवेगळया कारणांमुळे, मुलांना योग्य वेळी शाळेत घालत नाहीत. त्यामुळे काही मुले वरच्या वयाला शाळेत प्रवेश करतात. अनुभव असा आहे की, साधारणपणे उशीरा शाळेत दाखल होणारी मुले लवकर शाळा सोडतात. आजच, शाळांतून, वेगवेगळ्या इयत्तांतून वयाने मोठी असणाऱ्या मुलांची संख्या २५ टक्क्यांच्या आसपास असावी. त्यामुळे ही मुले शाळांतून फार काळ टिकून राहण्याची शक्यता कमी आहे. हे विद्यार्थी आपले आठवीपर्यंतचेही शिक्षण पूर्ण करतील याची खात्री नाही. त्यामुळे, शिक्षणातील व्यक्तिगत आणि सामाजिक अपव्यय टाळण्याचा एक मार्ग म्हणजे योग्य वयातच मुलांना शाळेत घालणे हा आहे.

सर्व शिक्षण अभियानामध्ये, आजपर्यंत, म्हणजे २०१० सालापर्यंत शालेय वयांतील सर्व मुलांना आठवीपर्यंत शिक्षण देण्याचा प्रस्ताव होता. परंतु ते तसे घडलेले नाही. खूप पैसे खर्चून देखील तसे घडलेले नाही. त्याची ‘अभियाना’ने दिलेली कारणे, अभियानाला दोषाबाहेर ठेवणारी अशीच आहेत. उदाहरणार्थ,

दर्जेदार शिक्षक नाहीत, शिक्षकांची गैरहजेरी फार मोठी असते, शाळांमधून पुरेशा सोयीसुविधा नाहीत किंवा स्थानिक समाजाची तपासणी नाही इत्यादी. खरं तर खूप मोठ्या महत्त्वाकांक्षी अशा सर्व शिक्षण अभियान प्रकल्पाला आलेले अपयश हे शासनातील भ्रष्टाचार हेच प्रामुख्याने आहे हे आता बाहेर येऊ लागले आहे. मुलांची गळती होण्यामुळे होणाऱ्या अप्रत्यक्ष अपव्ययापेक्षा पैशाचा फार मोठा अपव्यय शासकीय कर्मचाऱ्याच्या पैसे खाण्याच्या वृत्ती-कृतींतून होत आहे. कुंपणानेच शेत खाल्ले तर शिक्षा कोण कुणाला करणार ?

मुले शाळेत जात नाहीत, म्हणजे जाऊ इच्छित नाहीत आणि गेलीच तर टिकून राहू इच्छित नाहीत याचे प्रमुख कारण आहे ते म्हणजे, शाळाच वाईट आहेत. शाळांतील शिक्षणही वाईट आहे. प्रोबच्या अहवालातून यावर पुरेसा प्रकाश पडला आहे.

### ३. मुलांना शिकती करण्याचा प्रश्न

ऐन उमेदीची वर्षे घालवून, शिकण्याची ऊर्मी, स्वयंप्रेरणा, शिकण्याच्या उदंड क्षमता आणि शिकण्याची नैसर्गिक भूक घेऊन शाळेत येणारी मुले जर फारसे काही शिकत नसतील तर हा व्यक्तिगत कालापव्यय नि क्षमताव्यय फार मोठा आहे. सामाजिकदृष्ट्याही ते हितावह नाही. लहान वय हे आपणहून वेगाने शिकण्याचे वय असते. मात्र या वयात शाळेत जाऊ नही किंवा त्यांना सक्तीने दाखल करूनही जर त्यांना स्वतःहून शिकण्याची संधी मिळत नसेल, तर याचा अर्थ सरळ आहे की शाळांचेच आणि त्यांचे सद्य रूप घडविणाऱ्या सरकार-समाजाचे काहीतरी चुकते आहे.

चालू अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या आराखड्यात असा उल्लेख आहे की शाळेत चार वर्षे घालविल्यानंतरही, त्यांपैकी ५५ टक्के मुलांना, तीन अंकी संख्येला एक आकडी संख्येने भागता येत नाही; आणि त्यांचे (क्रमिक पुस्तकांचे) भाषा आकलनही अत्यंत कमजोर आहे. सहावीच्या बहुसंख्य मुलांना दुसरीचे क्रमिक पुस्तक वाचता येत नाही. असरचा अहवालही शिक्षणाची अशीच दारूण स्थिती आपल्या समोर ठेवतो. त्यांच्या सर्वेक्षणात असे आढळून आले आहे की, तिसरी-चौथीच्या ६६ टक्के मुलांना पहिलीचे क्रमिक पुस्तकही वाचता येत नाही. मुलांच्या स्व-भाषेच्या शालेय शिक्षणाची ही अशी स्थिती आहे.

महाराष्ट्रात, दहा वर्षांपूर्वी, पहिलीपासून इंग्रजी हा आणखी एक विषय मुलांच्या अभ्यासात आणला गेला, त्याची रंगीबेरंगी छानशी पाठ्यपुस्तकेही तयार करण्यात आली. व्यापक प्रमाणावर मुलांना शाळांमधून इंग्रजीचे धडे देण्यास सुरुवात झाली. काय आहे याचे फलित?

पाहणीच्या एका आकडेवारीनुसार, पहिलीतल्या ९९ टक्के व चौथीतल्या ८७ टक्के विद्यार्थ्यांना साधे इंग्रजी वाक्यही वाचता येत नाही. तर पहिलीतल्या ७२ टक्के व चौथीतल्या १६.७ टक्के विद्यार्थ्यांना इंग्रजीतील कॅपिटल लेटरही वाचता येत नाही. मुले शाळेत जाऊन इंग्रजी शिकताहेत, दरवर्षीची परीक्षाही उत्तीर्ण होताहेत,

तरीही आठवीपर्यंत जाऊन, म्हणजे आठ वर्षे शाळेत इंग्रजी शिकूनही त्यांच्यापैकी ३२.५ टक्के मुलांना साधी इंग्रजी वाक्ये वाचताही येत नाहीत. कहर म्हणजे, आठवीतल्या २.४ टक्के मुलांना अजून इंग्रजीतील कॅपिटल लेटरही वाचता येत नाही. अलीकडेच सकाळ वृत्तपत्राने एक छोटीशी पाहणी केली. या वर्षी, म्हणजे २०१० साली शालांत परीक्षेला बसलेले सर्व विद्यार्थी पहिलीपासून इंग्रजी शिकलेल्या पहिल्या गटाचे विद्यार्थी होते. या विद्यार्थ्यांनी सतत दहा वर्षे शाळेत इंग्रजी या विषयाचे अध्ययन केलेले आहे. तरीही त्यांच्यापैकी ६६ टक्के विद्यार्थ्यांना पाचवी-सहावीच्या स्तरावर अपेक्षित असलेले इंग्रजीही येत नाही.

विद्यार्थ्यांचे प्राथमिक शाळांमधील शिक्षण सामान्यतः कसे दर्जाहीन आहे हे सांगणारी वानगीदाखल घेतलेली ही काही उदाहरणे. केवळ भाषा आणि गणितच नव्हे तर जे इतर विषय विद्यार्थ्यांना शिकविले जातात, त्यांचीही गत फारशी वेगळी नाही. जेव्हा प्राथमिक शिक्षणच कच्चे राहते तेव्हा माध्यमिक शिक्षण पुरे करणे दुरापास्त ठरते आणि काही नैतिक अनैतिक मार्गांनी ते पुरे केलेच तर त्याचा दर्जाही कमीच राहतो.

सर्व मुले छान शिकतील अशी शिक्षणाला नेटकी दिशा नाही, शिक्षणावर सर्वतोपरी सरकारचीच हुकूमत आहे (उदाहरणार्थ, शाळांतून जाणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ८४.२ टक्के विद्यार्थी सरकारीशाळांतून जातात, आणि तीच नेमकी नीट शिकत नाहीत!), आणि, निसर्गतः मुले आपली आपणच शिकत असताना, त्यांना बळजबरीने सरकारी बडग्याखाली शिकविण्याचा घाट घातला जातो. ही, प्राथमिक शिक्षण दर्जेदार नसण्याची तीन प्रमुख संभवतात. प्राथमिक शिक्षणाच्या या सद्यस्थितीतच, या आर्थिक वर्षापासून, भारत सरकारने प्राथमिक शिक्षण सक्तीचे करणारा कायदा अंमलात आणला आहे. या कायद्यामुळे, प्राथमिक शिक्षणातील मूलभूत तीन प्रश्नांच्या संदर्भात सुधारणेच्या दिशेने काय घडू शकेल याचा काहीसा अंदाज घेता येईल.

❖